**STARS प्रकल्पांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे राज्य मूल्यमापन कक्ष (State Assessment Cell) स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०८/एसडी-६**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २४ एप्रिल, २०२३

<u>वाचा</u> :-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०१९/प्र.क्र.४९/एस.डी-६, दि.११ फेब्रुवारी २०२१.

२. राज्यातील शिक्षण पध्दतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (Strengthening Teaching-Learning And Results for States) केंद्र पुरस्कृत प्रकल्प राज्य अनुदान वितरण वित्तीय नियमावली मार्गदर्शक तत्वे.

३. प्रकल्प मान्यता मंडळ, भारत सरकार (स्टार्स प्रकल्प) यांचे दि.१६ सप्टेंबर २०२१ चे पत्र.

४. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. राशैसंप्रपम/राज्य मूल्यमापन कक्ष/२०२३२४/३१४, दि. १७/०१/२०२३.

५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. मप्राशिप्र/सशि/०२/Assessment/२०२२-२३/४९९, दि. १६/०२/२०२३

६. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र क्र. राशैसंप्रपम/राज्य मूल्यमापन कक्ष/२०२३-२४/१८४७, दि. १८/०४/२०२३.

**<u>प्रस्तावना:-</u>**

जागतिक बँकेद्वारे अर्थसहाय्य केल्या जाणा-या राज्यातील शिक्षण पद्धतीतील अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (Strengthening Teaching Learning and Results for States- STARS) या प्रकल्पासाठी महाराष्ट्रासह एकुण सहा राज्यांची (हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओडीशा, राजस्थान, मध्यप्रदेश आणि केरळ) Performance Grading Index मधील कामगिरीच्या आधारे निवड करण्यात आली आहे. पूर्व प्राथमिक ते इ. १२ वी या वर्गामध्ये दर्जेदार शिक्षण देणे आणि अध्ययन निष्पत्तीमध्ये वाढ करणे, शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या पद्धतीत सुधारणा, मूल्यमापन पद्धतीत सुधारणा या बाबींचा समावेश सर्व पातळीवर करुन शिक्षण क्षेत्रात मूलभूत सुधारणा करणे हे शिक्षण पद्धतीतील अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STARS) प्रकल्पाचे उद्दिष्ट असून, सदर प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी करण्यास संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत कलम २९ (१) नुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेला विद्याविषयक प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्यानूसार परिषदेमध्ये सद्यस्थितीत कार्यरत मूल्यमापन विभागाकडून पहिली ते बारावीसाठी मूल्यमापन कार्यपद्धती निश्चित करणे,

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे मदतीने राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) चे आयोजन करणे, राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणाचे (SLAS) आयोजन करणे, इयत्ता व विषयनिहाय प्रश्नपेढी निर्मिती करणे ही प्रमुख कार्ये केली जातात.

राज्यातील शिक्षण पध्दतीतील अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STARS) या केंद्र पुरस्कृत प्रकल्पामध्ये बदलत्या मूल्यमापन प्रणालींचा प्रभावीपणे वापर करण्याच्या अनुषंगाने राज्यस्तरावर एक सक्षम राज्य मूल्यमापन कक्ष (State Assessment Cell) सुरु करण्याचे प्रस्तावित केले असून, त्याअंतर्गत विद्यार्थ्यांचे वर्षभर जिल्हा /राज्य /राष्ट्रीय स्तरावरील विविध चाचण्या/सर्वेक्षण/ अहवाल/ वर्गाधारित मूल्यमापन करणे अपेक्षित आहे.

सदर बाब विचारात घेऊन, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे राज्य मूल्यमापन कक्ष (State Assessment Cell) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

२१ व्या शतकामध्ये तंत्रात होणाऱ्या बदलाचा सर्वांगिण विचार करून मूल्यमापन प्रक्रियेला गती मिळण्यासाठी स्वतंत्र मूल्यमापन कक्ष स्थापन करणे आवश्यक असून, सदर कक्षातील तज्ज्ञ मनुष्यबळाचा वापर करुन मूल्यमापनाची कार्यपद्धती निश्चित करणे, विविध चाचण्या व प्रश्न पेढी निर्मिती, सर्वेक्षणाचे आयोजन करणे इत्यादी बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येणार आहे.

त्यानूसार मूल्यमापन कार्यपद्धत्ती, मूल्यमापनाशी निगडीत शिक्षकांची प्रशिक्षणे, विविध प्रकारच्या चाचण्या व सर्वेक्षणांचे आयोजन तसेच मूल्यमापनासंबंधी अनुषंगिक बाबी इत्यादीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील शिक्षण पध्दतीतील अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STARS) या केंद्रपुरस्कृत प्रकल्पांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील मूल्यमापन विभागांतर्गत खालीलप्रमाणे राज्य मूल्यमापन कक्षाची (State Assessment Cell) स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**राज्य मूल्यमापन कक्ष संरचना**

| अ. नं. | पद | संख्या |
|---|---|---|
| १. | विषय तज्ज्ञ (भाषा- ०२/इंग्रजी-०१/ उर्दू-०१ तसेच गणित/ विज्ञान/ समाजशास्त्र- प्रत्येकी ०२) प्राथमिक व माध्यमिक साठी | १० |
| २. | मानसोपचार तज्ज्ञ ( Psychometrician) | ०२ |
| ३. | मूल्यमापन तज्ज्ञ | ०२ |
| ४. | माहिती विश्लेषक | ०१ |
| ५. | कार्यक्रम व्यवस्थापक | ०१ |
| | **एकूण** | १६ |

- परिषदेतील समन्वय विभागाचे प्राचार्य हे कक्ष प्रमुख राहतील.
- अ.क्र. १ येथील विषय तज्ज्ञांची पदे ही प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील.



Scanned with OKEN Scanner

- अनु. क्र. २ ते ४ येथील पदे कंत्राटी स्वरुपात ११ महिन्यांसाठी भरण्यात येतील. संबधितांच्या कामकाजाचे मूल्यमापन करून, काम समाधानकारक असल्यास त्यांना पुढील मुदतवाढ देण्यात येईल.
- अनु. क्र. ५ मधील कार्यक्रम व्यवस्थापक हे पद राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेव्यतिरिक्त शिक्षण विभागाच्या अन्य संस्थांमधील अधिकारी यांचेमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल अथवा सेवानिवृत्त अधिकारी यांचेमधून भरण्यात येईल.
- कक्षातील पदांची निवड प्रक्रिया शासन पुर्वमान्यतेने संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडून करण्यात येईल.

**राज्य मूल्यमापन कक्षाची उदिष्टे:-**

१. राज्यातील अध्ययन स्तरांमध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी राबविण्यात येणा-या विविध प्रकल्पांच्या नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये राज्याला शैक्षणिक आणि तांत्रिक सहाय्य प्रदान करणे.

२. अध्ययन मूल्यमापनाचा अभ्यास करण्यासाठी राज्य, जिल्हा आणि उपजिल्हा स्तरावरील विविध भागधारकांमध्ये क्षमता निर्माण करणे.

३. मानसशास्त्रीय विश्लेषण आणि दस्तऐवजीकरण प्रक्रिया मूल्यमापन अहवालासह विकसित करणे, सहाय्य करणे व मजबूतीकरण करणे.

४. राज्यातील सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन आणि शाळाधारित मूल्यांकन प्रक्रियेचे बळकटीकरण करणे.

५.राष्ट्रीय स्तरावरील Performance Assessment, Review, and Analysis of Knowledge for Holistic Development (PARAKH) च्या धर्तीवर त्यामधील निर्धारित उद्दिष्टानुसार काम करणे.

६. मूल्यमापन पद्धत्तीमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करणे, इयत्तानिहाय व विषयनिहाय प्रश्नपेढी (Item Banks) निर्मिती करणे, विद्यार्थी संपादणूकीचे सातत्यपूर्ण मूल्यांकन करून गुणवत्ता समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना करणे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत प्रशिक्षणाची सुविधा निर्माण करणे, सहाध्यायी मूल्यांकन, वर्ग मूल्यांकन, साप्ताहिक परिक्षा घेणे, मासिक प्रगती अहवाल निर्मिती इ. वर लक्ष केंद्रित करणे.

७. सर्व शाळांना चाचणीची सॉफ्ट/हार्ड प्रत पुरविणे.

८. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रम(PISA-Program for International Student Assessment) च्या दृष्टीने शिक्षकांना प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करण्यास मदत करणे.

९.राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) च्या धर्तीवर राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS) चे आयोजन करणे.

१०. शाळा आधारित मुल्यमापनासाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणीचे आयोजन करणे. त्यामध्ये सुरवातीला, मध्यंतरी व शेवटी चाचणीचे आयोजन करणे. त्यासाठीच्या इयत्तानिहाय व विषयनिहाय प्रश्नपेढी तयार करणे.



Scanned with OKEN Scanner

११. सर्वेक्षण अहवाल, चाचण्या इत्यादींमधील मूल्यांकन आकडेवारीच्या आधारे शिक्षकांसाठी गरजाधिष्ठीत प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

१२. मूल्यमापन संदर्भात सर्व प्रकारच्या अनुषंगिक बाबीसाठी आवश्यक त्या स्वरुपात ऑनलाईन / ऑफलाईन प्रणाली विकसित करून सतत अद्ययावत करणे. उदा. Mobile application, Website, Portal, Digital Spread sheets इत्यादी, गुणसंकलनासाठी आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर निर्मिती करणे.

१३. विद्या समिक्षा केंद्राशी संलग्न होऊन समन्वयाने काम करणे. त्यासाठी इयत्तानिहाय व विषयनिहाय चाचण्यांचे विकसन करून त्याचे आयोजन करणे, चाचणीच्या माहितीचे संकलन करणे, विश्लेषण करून त्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपायोजना करणे.

१४. राज्याच्या शालेय शिक्षणातील मूल्यमापन पध्दतीमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय निकषांच्या आधारे सुधारणा करणे.

१५. नियतकालिक मूल्यमापनासाठी इयत्तानिहाय व विषयनिहाय चाचण्यांचे विकसन करणे.

१६.नियतकालिक मूल्यमापन, विद्या समीक्षा केंद्र, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS), राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS), पायाभूत साक्षरता सर्वेक्षण (FLS) आधारित माहितीचे/ अहवालाचे विश्लेषण करून पुढील कार्यदिशा निश्चित करण्यास मदत करणे. तृतीय पक्षामार्फत निरीक्षण व पडताळणी करणे. विद्यार्थी केंद्रित सर्वांगिण प्रगती कार्ड निर्मिती करणे.

१७.मूल्यमापन संबंधातील इतर सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता करणे.

राज्य मूल्यमापन कक्ष हा संपूर्णपणे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे अधिपत्याखाली उपरोक्त उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कार्यरत राहील. त्यानुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (SCERT) मधील मूल्यमापन विभागाच्या समन्वयाने राज्य मूल्यमापन कक्ष काम करेल. राज्य मूल्यमापन कक्षाच्या कामकाजासाठी आवश्यक मंजूर निधी स्टार्स प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना उपलब्ध करून देण्यात येईल. समग्र शिक्षा अंतर्गत देखील राज्य मूल्यमापन कक्षाकरीता (State Assessment Cell) तरतूद आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार एकाच बाबीवर दूबार निधी खर्च होणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच स्टार्स प्रकल्पांतर्गत राज्य मूल्यमापन कक्षासाठी मंजूर बाबींव्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबींवर सदरचा निधी खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. केंद्र पुरस्कृत राज्यातील शिक्षण पद्धतीतील अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STARS) प्रकल्पाची मुदत संपल्यानंतर राज्य मूल्यमापन कक्षाच्या कार्याचा (State Assessment Cell) आढावा घेऊन त्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०४२४१६५३३३२५२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

IMTIYAZ MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=39a40419de755c2eab61fb555b2fdf8c8d6d652ff18fdffbd5c748ab01f6da04, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=77A529748C5E7C1BA7A66E81C654BA3C492FDA5B29E076241DB1BA213DDEDF4E, cn=IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.04.24 16:59:48 +05'30'

**( इ. मु. काझी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई



Scanned with OKEN Scanner

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री,शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) राज्य प्रकल्प संचालक,समग्र शिक्षा अभियान,चर्नी रोड, मुंबई
८) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य,पुणे
९) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१०) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
११) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) (सर्व)
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
१३) महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
१४) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
१५) अवर सचिव(अर्थसंकल्प),शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती, एसडी-६.



Scanned with OKEN Scanner